### अंतराळ स्थानकावरून पृथ्वीवर परतण्यासाठी १७ तास लागले !

■ ड्रॅगन कॅप्सूल वेगळे झाल्यापासून ते समुद्रात उतरेपर्यंत सुमारे १७ तास लागले. १८ मार्च रोजी सकाळी ८:३५ वाजता, अंतराळयानाचा दरवाजा उघडला गेला. १०:३५ वाजता अंतराळयान आयएसएसपासून वेगळे झाले. १९ मार्च रोजी पहाटे २:४१ वाजता डीऑर्बिट जळण्यास सुरुवात झाली. म्हणजेच, अंतराळयानाचे इंजिन कक्षापासून विरुद्ध दिशेने चालवण्यात आले. यामुळे अंतराळयान पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करू शकले आणि पहाटे ३:२७ वाजता फ्लोरिडाच्या किनाऱ्यावरील पाण्यात उतरले.

### स्वागतासाठी एक मोठी मिरवणूक, यात प्रार्थना आणि आतषबाजीसह दिवाळी आणि होळीसारखे वातावरण



# भारताची लेक 9 महिने 14 दिवसांनी पृथ्वीवर परतल्या!!

## तापमान वाढल्याने अंतराळयानाचा 7 मिनिटांसाठी संपर्क तुटला, फ्लोरिडा समुद्रकिनाऱ्यावर उतरले!

### सुनीता विल्यम्सच्या वडिलांच्या गावी मिरवणूक, होळी-दिवाळीसारखा आनंदोत्सव



### ८ दिवसांच्या मोहिमेवर गेले, पण ९ महिन्यांहून अधिक काळ लागला !

■ सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर बोईंग आणि नासाच्या ८ दिवसांच्या संयुक्त 'क्रू फ्लाइट टेस्ट मिशन'वर गेले. या मोहिमेचा उद्देश बोईंगच्या स्टारलाइनर अंतराळयानाची अंतराळवीरांना अंतराळ स्थानकात नेण्याची आणि परत आणण्याची क्षमता तपासणे हा होता. अंतराळवीरांना अंतराळ स्थानकावरील त्यांच्या ८ दिवसांच्या कालावधीत संशोधन आणि अनेक प्रयोग करावे लागले. पण थ्रस्टरमध्ये समस्या आल्यानंतर, त्यांचे ८ दिवसांचे मिशन ९ महिन्यांहून अधिक काळ वाढवण्यात आले.

■ वॉशिंग्टन / वृत्तसंस्था

भारतीय वंशाच्या अमेरिकन अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर ९ महिने आणि १४ दिवसांनी पृथ्वीवर परतले आहेत. त्यांच्यासोबत क्रू-९ चे आणखी दोन अंतराळवीर आहेत, अमेरिकेचे निक हेग आणि रशियाचे अलेक्झांडर गोबुनौव्ह. त्यांचे ड्रॅगन अंतराळयान १९ मार्च रोजी भारतीय वेळेनुसार पहाटे ३:२७ वाजता फ्लोरिडाच्या किनाऱ्यावर उतरले. या चार अंतराळवीरांनी मंगळवारी (१८ मार्च) आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानक (क्रर) सोडले. जेव्हा हे अंतराळयान पृथ्वीच्या वातावरणात आले तेव्हा त्याचे तापमान १६५० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त होते. या काळात सुमारे ७ मिनिटे संपर्क तुटला, म्हणजेच अंतराळयानाशी कोणताही संपर्क झाला नाही.



### सुनीता विल्यम्सच्या वडिलांच्या गावी मिरवणूक, होळी-दिवाळीसारखा आनंदोत्सव

सुनीता विल्यम्सच्या सुरक्षित परतीसाठी त्यांच्या वडिलांचे गाव झुलासणमध्ये दिवाळीसारखी तयारी केली होती. सुनीता सुखरुप आल्याचे कळताच या गावात जल्लोष साजरा झाला. सुनीता यांचे चुलत भाऊ नवीन पंड्या यांनी सांगितले की, त्यांच्या स्वागतासाठी एक मोठी मिरवणूक काढण्यात आली. यात प्रार्थना आणि आतषबाजीसह दिवाळी आणि होळीसारखे वातावरण होते. मिरवणुकीत सुनीतांचे छायाचित्र होते. ग्रामस्थ त्यांच्या सुरक्षित परतीसाठी प्रार्थना करत होते. अखंड ज्योतही लावण्यात आली होती. ही ज्योत सुनीता अंतराळात गेल्या तेव्हापासून जळत आहे. ग्रामप्रमुख विशाल पंचाल यांनी सांगितले की, शाळकरी मुलेही १५ दिवसांपासून त्यांच्या सुरक्षित परतीसाठी रामधून गात आहेत. सुनीता यांचे वडील दीपक पंड्या यांचे मूळ गाव झुलासण आहे. ते १९५७ मध्ये अमेरिकेत गेले होते.

## टाळ मृदंगाच्या गजरात पैठण नगरी दुमदुमली

पैठण । दिव्य न्युज : व्ही.एन.खंडागळे

दरवर्षीप्रमाणे यंदाही नाथषष्ठीनिमित्त महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यातून वारकरी संप्रदायातील सर्व वारकरी पैठण नगरीमध्ये दाखल झालेले आहेत काही होतदाखल आहेत. भानुदास एकनाथ च्या गजरामध्ये पैठण नगरी दुमदुमली आहे. गोदावरीच्या वाळवंटामध्ये आपाआपले आखाडे लावून वारकरी सज्ज झालेले आहेत. पंढरीच्या वारी प्रमाणे नाथाच्या घरची वारी करण्यासाठी हजारो मैल पायी दिंडीने वारकरी भानदास एकनाथ असा गजर करीत या प्रतिष्ठान नगरीत दाखल झालेले आहेत. गेल्या एक महिन्यापासून वारकरी पायी दिंडीने निघाले आहेत काही पोहोचले काही येत आहेत हा दिंडी सोहळा वर्षानुवर्षे वारकऱ्यांच्या आश्रयाचे ठिकाण असलेले गोदावरी नदीतील वाळवंटाचे पात्र आता मात्र फुललेले आहे.



साधु संत येती घरात तोचि दिवाळी दसरा या युक्तीप्रमाणे नाथ षष्ठी सोहळ्यासाठी दरवर्षी येणारे वारकरी भावीक भक्तांची स्वागत करण्यासाठी पैठणकरचा उत्साह वाढला आहे. कुटुंबातील प्रत्येक व्यक्ती या वारकऱ्याच्या सेवेसाठी धावून पुढे येत आहे प्रत्येक घर परिसरातील छोट्या मोठ्या मंडप लावून विद्युत रोषनाई करून षष्ठीकाळात भजन कीर्तन हरिपाठ भारुड हरिनामाचा गजर होत असतो. यामध्ये बाल गोपाल मोठ्या प्रमाणात सहभागी असतात व आनंदी असतात. महाराष्ट्राच्या पंचक्रोशीतून येणाऱ्या वारकऱ्यांची व्यवस्थित सोय व्हावी यासाठी नगरपरिषद मुख्याधिकारी संतोष आगळे यांनी सर्व कर्मचाऱ्यासहित नदीपात्रातील स्वच्छता केली आहे. व वारकऱ्यांना जागा उपलब्ध करून दिली आहे. म्हणजे सर्व मंडळींना आपापल्या फडामध्ये व्यवस्थित कीर्तन जागर करता यावे यासाठी सर्व नगरपरिषद चे कर्मचारी यांनी काम केलेले आहे. म्हणून आज गोदावरी नदी पात्रामध्ये बाहेरून येणाऱ्या सर्व वारकऱ्यांची सोय व्यवस्थित झालेली आहे. पाणी विद्युत पुरवठा ह्या सुविधा उपलब्ध करून दिलेले आहेत.

## नूर फातेमाचा आयुष्याचा पहिला रोजा पूर्ण

औरंगाबाद । दिव्य न्युज

कटकट गेट मध्ये रहिवाशी आदिल बिन खालेद यांची मुलगी नूर फातेमा यांनी मार्च महिन्याचा कडक उन्हाळा असतांना या चुकीलीने १७ मार्च २०२५ रोजी आपल्या आयुष्याचा पहिला रोजा पुर्ण केला या बद्दल नातेवाईक, आई वडिल, यांनी शुभेच्छा दिली. नातेवाईक, परिवार यांनी शुभेच्छा देऊन अतिभनंदन व्यक्त केले.



## असा हा रात्रीचा संसार



बसस्थानकाच्या बाहेर मोकळ्या जागेत अनेक असाह्य लोक रात्री उशिरा अशी विश्रांती घेतात. त्याआधी मिळालेले खाद्यपदार्थ खातात. छाया : आकाश नाईक



### रात्री विश्रांतीसाठी बसस्थानक परिसराचा आधार

दिवसभर पोटासाठी मागून रात्री गर्दीचे ठिकाण असलेल्या बसस्थानक परिसरात विश्रांती घेणारे असाह्य लोक पाहायला मिळत असतात. काही ठिकाणी अशा परिसरात नशा करून गोंधळ करणारेही पाहायला मिळतात. कधी-कधी प्रवाशांनाही याचा अतित्रास होतो.

## लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांप्रती सहवेदना व्यक्त करण्यासाठी शेतकऱ्यांचा एक दिवस उपवास- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश । दिव्य न्युज

(दि.१९) शेतकऱ्यांच्या आत्महत्या हि राष्ट्रीय आपत्ती असुन आत्महत्या रोखण्याचा कायमस्वरूपी उपाय म्हणून शेतकरी विरोधी सिलिंग, आवश्यक वस्तु, जमीन अधिग्रहण कायदे रद्द करण्यात यावेत या प्रमुख मागणीसह यवतमाळ जिल्ह्यातील चिलगव्हाण येथील साहेबराव करपे,मालतीताई करपे यांनी १९ मार्च १९८६ रोजी आर्थिक विवंचनेतुन आपल्या ४ लहान मुलांसह सामुहिक आत्महत्या केली होती.या सामुहिक आत्महत्येची शासन दरबारी पहिली शेतकरी आत्महत्या म्हणून नोंद झाली.या घटनेला यावर्षी ३९ वर्षे पूर्ण झाली आहेत. नॅशनल क्राईम रेकॉर्ड पोलिसांच्या माहितीनुसार देशभरात दररोज सुमारे ४५ शेतकरी आत्महत्या करतात. तर महाराष्ट्रात दररोज सुमारे १५ शेतकरी आत्महत्या करून मृत्युला कवटाळतात. बीड जिल्ह्यात २०१४ ते २०२४ या १० वर्षाच्या कालावधीत २४३२ शेतकऱ्यांनी आत्महत्या करून जीवन संपवले आहे.

८ वर्षांपासून १९ मार्च २०१९ पासुन



किसानपुत्र आंदोलनाचे प्रणेते अमर हबीब आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी राज्यातील आणि देशातील आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांप्रती आदरभाव व्यक्त करण्यासाठी दरवर्षी १९ मार्च रोजी अन्नदात्यासाठी एक दिवस उपवास करून शासनाच्या शेतकरी विरोधी धोरणाविरोधात प्रभावी संदेश देण्यासाठी शेतकरी आत्महत्या रोखण्याचा कायमस्वरूपी उपाय म्हणून शेतकरी विरोधी कायदे रद्द रद्द करण्यात यावेत.प्रशासनाच्या निष्क्रियतेला जाब विचारण्यासाठी, शेतकऱ्यांचे हक्क व अस्तित्व वाचवण्यासाठी एल्गार करण्याच्या उद्देशाने संवेदनशील नागरीकांनी एक दिवसाचा कडकडीत उपवास करत आपल्या सहवेदनेचा, पाठिंब्याचा आणि आंदोलनाच्या जाज्वल्य हेतुचा जागर करण्यासाठी अमर हबीब यांच्या मार्गदर्शनाखाली वैयक्तिक उपवास, सामुहिक उपोषण, श्रद्धांजली सभा आदिंचे आयोजन करण्यात यावे असे आवाहन करण्यात आले असुन या आवाहनाला प्रतिसाद देत किसानपुत्र आंदोलक डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली आज दि.१९ बुधवार रोजी सकाळी १० ते ४ वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात सामुहिकरीत्या एक दिवस अन्नत्याग आंदोलन करत आत्महत्या केलेल्या तमाम शेतकऱ्यांप्रती आदरभाव व्यक्त करण्यासाठी शेतकरी सहवेदना दिवस पाळण्यात आला. यावेळी आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव, माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ गिरे, ग्रामपंचायत सदस्य श्रीहरी निर्मळ, दामोदर थोरात, महादेव कुदळे, अँड.गणेश वाणी, भगवान मोरे, रामकिसन गिरे, पांडुरंग वाणी, रामचंद्र मुळे,आश्रुबा गिरे, राजेंद्र वायभट, साहेबराव निर्मळ , महादेव ढास, संतोष भोसले, संजय सुकाळे , पत्रकार हरीओम क्षीरसागर आदी सहभागी झाले होते.

## ग्रामपंचायत सरपंचपदाचे आरक्षण सोडत २५ मार्च रोजी–तहसीलदार वैशाली पाटील

दौलावडगाव/ दिव्य न्युज...

आष्टी तालुक्यातील आगामी ग्रामपंचायत निवडणुकी साठी सरपंच पदाचे आरक्षण सोडत कार्यक्रमाचे आयोजन आष्टी तहसील कार्यालयामध्ये दि.२५ मार्च २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता करण्यात येणार असून यावेळी नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन आष्टी तहसीलदार श्रीमती वैशाली पाटील यांनी केले आहे.. याविषयी अधिक माहिती देताना त्यांनी दि.१८ मार्च २०२५ रोजी प्रेस नोट जारी केली असून त्यामध्ये म्हटले आहे की, महाराष्ट्र शासन ग्रामीण विकास विभाग,तसेच बीड जिल्हाधिकारी कार्यालय यांचे निर्देशाप्रमाणे..

मुंबई ग्रामपंचायत सरपंच व उपसरपंच नियम १९६४ मधील नियम ३ (अ) प्रमाणे तालुक्यातील सरपंचाची पदे वेगवेगळ्या प्रवर्गासाठी तसेच समांतर प्रवर्गासाठी आगामी पाच वर्षाकरिता सन २०२५ ते २०३० या कालावधीसाठी गठीत होणाऱ्या ग्रामपंचायती करता सरपंच पदासाठी सोडत पद्धतीने आरक्षण कार्यक्रम दि.२५ मार्च २०२५ सकाळी ११:००वा.आष्टी तहसील कार्यालय सभागृहामध्ये आयोजित करण्यात आला आहे.. आष्टी तालुक्यातील आगामी १२५ ग्रामपंचायत सरपंच पदाच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम यामध्ये जाहीर होणार आहे..

या वेळी उपस्थित रहावे असे आवाहन या प्रेस नोट व्दारे करण्यात आले आहे



सय्यद मरयम यांनी मार्च महिन्याचा कडक उन्हाळा असतांना आपल्या आयुष्याचा पहिला रोजा पुर्ण केला या बद्दल नातेवाईक, आई वडिल, यांनी शुभेच्छा देऊन कौतुक केले

## एमपीएससीद्वारे मोठी भरती होणार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा, हजारो विद्यार्थ्यांना दिलासा

मुंबई । दिव्य न्युज


राज्यातील महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या परिक्षांचे अनियमित वेळापत्रक आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यातील विद्यार्थी प्रशासकीय सेवेचे स्वप्न उराशी बाळगून स्पर्धा परिक्षांची तयारी करत असतात. मात्र लोकसेवा आयोगाच्या लालफिती कारभारामुळे हजारो विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. त्यामुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला सक्षम बनवावे, अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार) पक्षाचे आमदार शिवाजीराव गर्जे यांनी लक्षवेधीद्वारे विधानपरिषेदत केली होती. यावर उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यूपीएससीच्या धर्तीवर एमपीएससीच्या परीक्षांचे कॅलेंडर तयार केले जाणार असल्याचे म्हटले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, यूपीएससीमध्ये कधी परीक्षा होणार, कधी मुख्य परीक्षा आणि मुलाखत होणार, याचे कॅलेंडर निश्चित असते. पण दुर्दैवाने आपल्याकडे कॅलेंडर तयार केल्यानंतरही त्याची अंमलबजावणी झालेली नाही. २०१८-१९ पासून राज्यात आरक्षणाचे वेगवेगळे निर्णय झालेले आहेत. ईडब्लूएस, एसईबीसीचा विषय पुढे येतो. वेगवेगळ्या न्यायालयाने दिलेल्या स्थगितीमुळे कधी कधी भरतीमध्ये अधिक वेळ लागतो. पण पुढच्या काळात यूपीएससीप्रमाणे एमपीएससीने कॅलेंडर तयार करण्यावर भर दिला जाईल.

# नवीन रेल्वे, राष्ट्रीय महामार्गाच्या कामांना गती द्या

## खा.बजरंग सोनवणे यांच्या मुंबईतील बैठकीत अधिकाऱ्यांना सुचना, दोन्ही विभागाकडून घेतला आढावा





### या मार्गांना दर्जोन्नतीचा प्रस्ताव :

पिठ्ठी-लिंबादेवी-गारमाथा-अंमळनेर-धामनगाव-टाकळी काझी, तर दुसरा उमापूर फाटा ते उमापूर-शेवगाव या दोन मार्गांना दर्जेन्नती करणे, या विषयावर बैठकीत चर्चा झाली असून या कामासाठी अधिकाऱ्यांनी सदरील प्रक्रिया राबविण्यास सुरूवात करू, असे म्हटले. दोन्ही मार्गावर वाहनांची मोठी वर्दळ असते.

### धारूर घाटावर फोकस

धारूर घाटात अनेक अपघात होऊन प्रवाशांचे बळी गेलेले आहेत. सदरील घाटाचे काम व्हावे, यासाठी खा.बजरंग सोनवणे वारंवार पाठपुरावा करत असून या घाटासी पर्यायी मार्ग कामाला मंजूरी मिळालेली असून तातडीने निवीदा प्रक्रिया पुर्ण करावी आणि कामाला सुरूवात करून काम पुर्ण करावे, याबाबतही अधिकाऱ्यांना बैठकीत सुचना दिल्या.



बीड । दिव्य न्युज

अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वेमार्ग, धाराशिव-बीड-छत्रपती संभाजी नगर या नवीन रेल्वे मार्गासाठी अंतिम स्थान सर्व्हेक्षणाला निधी देण्यात आला असून सर्व्हेक्षणाच्या कामाला गती द्या, राष्ट्रीय महामार्गाचे अर्धवट असलेली कामे तातडीने पुर्ण करा, नवीन दोन रस्ते दर्जोन्नत करुन राष्ट्रीय महामार्ग करावेत अशा सुचना खा.बजरंग सोनवणे यांनी दिल्या.

दि.१७ मार्च रोजी दिल्ली येथील संसदेत बीड रेल्वे जंक्शन व रेलमार्ग कामांनी गती देण्यासाठी आवाज उठविला होता. यानंतर दि.१८ रोजी सरव्यवस्थापक कार्यालय, सीएसटी मुंबई येथे खा.बजरंग सोनवणे यांच्या उपस्थितीत अधिकाऱ्यांसमवेत बैठक संपन्न झाली. यावेळी ते बोलत होते. बैठकीला सरव्यवस्थापक धरमवीर मीना, एस.एसगुप्ता, ए.के.पांडे, सीपीआरओ स्वप्नील निला, डीजीएम के.के.मिश्रा यांची उपस्थिती होती. यावेळी अश्विनी वैष्णव यांनी धाराशिव-बीड-छत्रपती संभाजी नगर या नवीन रेल्वे मार्गासाठी अंतिम स्थान सर्व्हेक्षणाला निधी दिला असून आता तातडीने सर्व्हेक्षणाचे काम सुरू करावे, अहिल्यानगर- बीड- परळी रेल्वेचे काम सुरू आहे. आता अहिल्यानगर ते बीडपर्यंत रेल्वेची जलदगती चाचणी झालेली आहे. तर पुढील कामाला गती देऊन लवकरात लवकर परळीपर्यंतचे काम पुर्ण करावे, अहमदनगर-बीड-परळी रेल्वे मार्गाच्या कामामुळे काकडवाडी, सोलापूरवाडी, धानोरा, कडा, कारेगाव, विघनवाडी, हिवरसिंगा, चऱ्हाटा, ढोलेवस्ती आणि इतर ठिकाणी सडक वाहतूक बाधित झाली आहे. त्यामुळे शालेय विद्यार्थी, वृद्ध आणि प्रवाशांना अडचणी येत आहेत. यासाठी या ठिकाणी तसेच बीड-परळी मार्गावरील आवश्यक ठिकाणी पुल बांधण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी कार्यवाही करावी, अशा सुचना दिल्या तर राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या बैठकीत केंद्रीय दळणवळण विभागाचे विभागीय अधिकारी फेगडे यांचेसह राष्ट्रीय महामार्ग विभागाचे सर्व मुख्य अभियंते, कार्यकारी अभियंते व संबंधित अधिकारी उपस्थित होते. यावेळी अहमदपूर-धायगुडा पिंपळा-अंबाजोगाई-लोखंडी सावरगाव-केज-मांजरसुंबा या मार्गाला दुहेरी मार्ग करणे, लातूर-बर्दापूर-लोखंडी सावरगाव या मार्गासही दुहेरी मार्ग करणे, परतूर-माजलगाव-धारूर-केज-कळंब- येरमाळा-कुसळंब या मार्गातील अर्धवट कामे पुर्ण करणे, खरवंडी-आर्वी- ब्र. येळंब- न. राजुरी-बीड- वडवणी-परळी रस्ता पूर्ण करुन सुधारणा करणे, मांजरसुंबा ते चुंबळीफाटा मार्गातील अडथळे योग्य त्या उपाययोजना पुर्ण करून काम पुर्ण करणे, पैठण-पंढरपूर रा.मा. मधील मळेकरवाडी घाटामधे तातडीने डांबरीकरण करणे, चुंभळी व पाटोदा येथील अडथळे दूर करुन कामे पूर्ण करणे आदि विषयावर सविस्तर चर्चा झाली.

## गरिबांचे फ्रीज विक्रीला



उन्हाळ्यात पाणी थंड राहावे यासाठी गरिबांचे फ्रीज म्हणून ओळख असलेल्या मातीच्या माठांना मागणी असते. हेच माठ सध्या बाजारात विक्रीसाठी आले आहेत.

## सर सय्यद अहेमद खान व पिपल्स माध्यमिक शाळेत उर्दू, इंग्रजी, मराठी तिन्ही भाषेत अर्ज ॲक्टिव्हिटी





बीड । दिव्य न्युज

शालेय जीवनात शिकलेल्या अर्जाचे महत्व खूप अनन्यसाधारण आहे. अर्ज शिकल्याने आपल्याला दैनंदिन जीवनात त्याचे वापर खूप मोठ्या प्रमाणात होते. जसे नोकरीसाठी अर्ज (application) करणे हे आवश्यक आहे, कारण ते आपल्याला योग्य कंपनीत काम करण्याची संधी मिळवून देते. परवानग्या मिळवण्यासाठी अर्ज करणे आवश्यक आहे, जसे की वाहन परवाना, बांधकाम परवाना, इत्यादी. शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी:शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी अर्ज करणे आवश्यक आहे, जसे की शिष्यवृत्ती, घरकुल योजना, इत्यादी. कायदेशीर प्रक्रियेसाठी: काही कायदेशीर प्रक्रियेसाठी अर्ज करणे आवश्यक आहे, जसे की मालमत्तेचे हस्तांतरण, वारसा हक्क, इत्यादी. संस्थेसोबत संवाद साधण्यासाठी:संस्थेसोबत संवाद साधण्यासाठी अर्ज करणे आवश्यक आहे, जसे की तक्रार नोंदवणे, सूचना देणे, इत्यादी. अर्जाचे स्वरूप: अर्ज योग्यरित्या भरल्यास, आपल्या मागणीची नोंद होते आणि आपल्याला अपेक्षित मदत मिळण्याची शक्यता वाढते. अर्जाचे प्रकारपुढील प्रमाणे असतात अर्ज अनेक प्रकारांचे असू शकतात, जसे की नोकरी अर्ज, परवाना अर्ज, शासकीय योजना अर्ज, इत्यादी. अशा प्रकारे अर्जाचे विविध उद्दिष्टे समोर ठेवून दिनांक १८ मार्च रोजी शाळेत उर्दू, इंग्रजी, मराठी या तिन्ही भाषेत ॲक्टिव्हिटी घेण्यात आली. त्या मध्ये पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यावेळी त्यांची लिहिताना पाहणी करताना शाळेचे सचिव अब्दुल वकील सर आणि शाळेचे शिक्षक वृंद उपस्थित होते.

# बीडच्या विमानतळाला लागणारा निधी लाखा वरुन कोटीत गेला

# ५० लाखात होणाऱ्या कामाला आता मोजावे लागणार ५० कोटी

## शहाजानपूर येथे १५३ हेक्टर जमीन उपलब्धः अधिवेशनात अजित पवारांनी घोषणा केल्याने बीडकरांच्या आशा पल्लवीत

बीड । दिव्य न्युज



बीडच्या विमानतळास २०११-१२ मध्ये तत्त्वतः मंजुरी मिळाली होती, त्यावेळी ५० लाख रुपयांची तरतूद करण्याचे ठरले होते; मात्र त्यानंतर याबाबत काहीच निर्णय झाला नव्हता. तब्बल १२ वर्षांनंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बीडमध्ये विमानतळ होणार असल्याची घोषणा केली. २०११-१२ मध्ये विमानतळ भूसंपादनासाठी ५० लाख रुपयांची तरतूद होती; परंतु आता ५० कोटींची तरतूद करावी लागणार आहे. म्हणजेच भूसंपादन १०० पटींनी वाढले आहे.

बीड येथील ३० जानेवारी रोजी झालेल्या 'डीपीसी'च्या बैठकीत पालकमंत्र्यांनी विमानतळाबाबत सकारात्मकता दाखवली होती. त्यानंतर ३१ जानेवारी रोजी जिल्हा प्रशासनाने नवीन विमानतळ उभारणीसाठीचा प्रस्ताव मंत्रालयास सादर केला. एमएडी कंपनीचे महाव्यवस्थापक आर. पी. चाऊल यांनी नवीन विमानतळासाठी १३५ हेक्टर जागेची आवश्यकता असल्याचे नमूद केले होते. त्यानुसार बीड तालुक्यातील शहाजानपूर (लिंबा) येथे एकूण १५३.५७ हेक्टर जमीन उपलब्ध असल्याचे नमूद केले. तसेच विमानतळासाठी एकूण प्रस्तावित क्षेत्र अंदाजित २५०० मीटर लांबी व १५०० मीटर रुंद असे १५३.५७ हेक्टर क्षेत्र आहे. त्यापैकी शासकीय गायरान जमीन १० हेक्टर ६९ आर, तर उर्वरित १४२.८८ हेक्टर आर खासगी संपादित करावी लागणार आहे. खासगी भूसंपादनासाठी अंदाजित प्रतिहेक्टरी ६ लाख याप्रमाणे अंदाजित ४५ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी बीडमध्ये विमानतळ होणार असल्याची घोषणा विधिमंडळात सोमवारी केल्याने या कामास आता गती मिळणार आहे.

### २०११-१२ मध्ये तत्त्वत: मंजुरी

१ सार्वजनिक उपक्रम मंत्री तथा बीड जिल्ह्याचे तत्कालीन पालकमंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या अध्यक्षतेखाली २७ जानेवारी २०११ रोजी जिल्हा नियोजन समितीची बैठक झाली होती.

२ जिल्ह्यामध्ये उद्योगधंद्यांची भरभराट व्हावी, गतिमानता वाढावी, यासाठी बीड येथे विमानतळ करण्याबाबत तत्त्वत: मंजुरी बैठकीत देण्यात आली होती.


३ वर्ष २०११-१२ मध्ये विमानतळाबाबत तत्त्वत: मंजुरी देऊन ५० लक्ष रुपयांची तरतूद करण्याचे ठरविण्यात आले होते. सध्या यासाठी ५० कोटींची तरतूद लागणार असल्याचे प्रस्तावात नमूद आहे.

### विजयसिंह पंडित यांच्या मागणीला यश

आमदार विजयसिंह पंडित यांनी विधानसभेमध्ये अर्थसंकल्पीय अधिवेशनात बीड येथे नवीन विमानतळ उभारणीची मागणी केली होती, त्यांच्या मागणीला यश आले.

उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी आ. विजयसिंह पंडित यांच्या मागणीचा उल्लेख करून विधानसभेत बीड येथे नवीन विमानतळ उभारण्याची घोषणा केली. यामुळे बीड जिल्ह्याच्या विकासाला गती मिळणार असून, जिल्ह्यातील उद्योगवाढीला मोठा फायदा होणार आहे.


नाथषष्ठीसाठी येणाऱ्या सर्व भाविकांचे हार्दिक स्वागत!



कार्यालय नगर परिषद पैठण

Email:munptn@gmail.com दूरध्वनी नंबर:०२४३१-२२३०१०

जा.क्र.नपपै/यात्रा/कावि/२०२५/४२० दिनांक:१८/०३/२०२५

जाहिर आवाहन

पैठण शहरातील सर्व नागरीकांना व यात्रेकरुना सुचित केले जाते की, यात्रेच्या काळात ताप, सर्दी, खोकल्याचा संसर्ग होऊ नये म्हणुन खालील दक्षता व उपाययोजना करावी रोगाचा प्रसार व संसर्ग होणार नाही. यासाठी सहकार्य करावे.

१) तापेचा साथीचा उगम हा घरोघर साठवलेल्या पाण्याच्या माध्यमाने होत असतो त्या करीता दिर्घ काळातील साठवलेले पाणी काढुन टाकावे व पाण्याचा हाऊद स्वच्छ करुन घ्यावा पाणी गाळुन व उकळुन प्यावे.
२) यात्रेकरुने व पैठण शहरातील दुकानदाराने नगर परिषदेची परवानगी घेऊनच दुकाने लावावीत.
३) विक्रेत्यांनी विक्रीच्या ठिकाणी शिळे, उघडे अन्न व सडलेला भाजीपाला, फळे विक्रीसाठी ठेऊ नये अन्न पदार्थ झाकुन ठेवावेत.
४) गोदावरी नदीत पोहण्यास सक्त मनाई आहे.
५) गोदावरी नदीच्या पात्रात पाण्यासाठी खड्डे व झरे करुन पाणी पिण्यासाठी वापरु नये.
६) हॉटेल धारकांनी पिण्याचे पाणी साठविण्याचे हाऊद, रांजण, माठ इत्यादी दररोज स्वच्छ धुऊन घ्यावेत.
७) दुकानदारांनी केर कचरा, घाण रस्त्यावर टाकु नये आपला परिसर स्वच्छ ठेवावा.
८) नागरीकांनी आपल्या घराचा परिसर स्वच्छ ठेवावा व पाण्याचे डबके तयार होऊ देऊ नयेत साचलेले पाणी काढुन टाकावे व जंतु नाशक औषधाचा वापर करावा.
९) शहर स्वच्छतेसाठी सर्वतोपरी सहकार्य करावे.
१०) पाण्याचा अपव्यय टाळावा.
११) पाण्याचा वापर योग्य प्रमाणात करावा.
१२) सार्वजनिक रस्ते, खुल्या जागा इत्यादी परिसर अस्वच्छ करु नये.
१३) नाल्यामध्ये केर कचरा टाकु नये.
१४) जनावर धारकांनी आप आपले जनावरे मोकाट फिरणार नाहीत याची दक्षता घ्यावी.
१५) आरोग्याच्या दृष्टीकोणातुन काही माहिती, मदत किंवा मार्गदर्शन हवे असल्यास पैठण ग्रामिण (सरकारी रुग्णालय) विभागाशी संपर्क साधावा.



स्वाक्षरीत/-
(संतोष आगळे)
मुख्याधिकारी तथा प्रशासक
नगर परिषद पैठण

सर्व कर्मचारी वृंद नगर परिषद पैठण जिल्हा छत्रपती संभाजीनगर



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०